| *MHAU050021692024* | **फौ.किरकोळ अर्ज.क्र.२२७/२०२४**<br>हादिया शहेबाज शेख<br>**विरुध्द**<br>शहेबाज सिराज शेख व इतर |
|---|---|

## अंतरिम पोटगी अर्ज निशाणी ०५ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने कौंटुबीक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा कलम २३ प्रमाणे गैरअर्जदाराकडुन अंतरिम संरक्षण व अंतरिम पोटगी मिळावी यासाठी दाखल केलेला आहे.

२. अर्ज व त्यावरती दाखल केलेल्या जबाबाचे अवलोकन केले. अर्जदारातर्फे विव्दान वकील एच. एम. पठाण आणि गैरअर्जदारातर्फे एस. एस. चौधरी यांचा युक्तिवाद ऐकला.

३. उभय पक्षकरांच्या वतीने करण्यात आलेली परस्पर विरोधी कथने विचारात घेता प्रस्तुतचा अर्ज निकाली काढते वेळी खालील मुद्दे माझे विचारार्थ उपस्थित होतात.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार हिने गैरअर्जदारांनी तिच्यावर वेळोवेळी कौंटुबिक हिंसाचार केला हे सिध्द करते काय ? | **होकारार्थी.** |
| २. | अर्जदार ही कौंटुबिक हिंसाचार कायदा कलम २३ नुसार गैरअर्जदारकडून अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र ठरते काय ? | **अंशतः होकारार्थी.** |
| ३. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दा क्र.१ करीताः–</u>**

४. अर्जदाराने अर्जातील कथनांना पुष्टी देण्यासाठी निशाणी ३ नुसार स्वतःचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. याव्यतिरिक्त अर्जदाराने निशाणी ४ वरील यादीसोबत विवाहाचा बायोडाटा व तलाकनामा, तसेच मालमत्ता व दायित्व प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहेत. तसेच गैरअर्जदारांनी त्यांच्या कथनांच्या पृष्ठ्यर्थ मालमत्ता व दायित्व प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे.

५. अर्जदाराचे थोडक्यात कथन असे की, अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ यांचा विवाह दि. १७.११.२०२३ रोजी वैजापुर संपन्न झाला. अर्जदार यांच्या आईवडीलांनी विवाहामध्ये ५ लाख रुपये खर्च करुन गैरअर्जदार यास अर्ध्या तोळ्याची अंगठी देऊन व अर्जदार हिला नेकलेस, २ अंगठी व सोन्याचे कानातील नथनी देऊन मोठे थाटामाटात लग्न करुन दिले आहे.

६. अर्जदाराचे पुढे असे कथन असे की, अर्जदार हिचेबरोबर सोयरीक जमवते वेळेस गैरअर्जदार यांनी सांगीतले की, गैरअर्जदार हा फिजीओ थेरीपिस्ट आहे व दवाखाना देखील आहे. लग्नानंतर अर्जदार सासरी नांदण्यासाठी गेले. गैरअर्जदार क्र.२ हे श्रीगोंदा येथील कॉलेजमध्ये प्रिन्सीपल आहेत. गैरअर्जदार क्र. ४ हिचे लग्न होऊन तिला १० वर्षाचा मुलगा आहे व तिचा तलाक झाल्यापासुन ती गैरअर्जदारांसोबतच राहते. गैरअर्जदार यांचे जवळचे नातेवाईक अर्जदाराच्या संसारामध्ये ढवळाढवळ करत असे. गैरअर्जदारांनी अर्जदाराकडुन दवाखान्यासाठी प्लॉट घेऊन बांधकाम करण्यासाठी अर्जदारास तिच्या आईवडीलांकडुन १५ लाख रुपये घेऊन यावे, नाहीतर दुसरे लग्न करुन तुला तलाक देऊन टाकु अशी धमकी देत असे. गैरअर्जदार यांनी शारिरक व मानसिक त्रास देत असे व अर्जदार हिचा छळ करुन उपाशी पोटी ठेवत असे. गैरअर्जदार क्र. २ ते ५ हे गैरअर्जदार क्र. १ याला

अर्जदारास मारहाण करण्यासाठी चिथावणी देत असे. त्यामुळे अर्जदाराने पोलिस स्टेशन, वैजापुर येथे ४९८–अ व इतर कलमांन्वये तक्रार दाखल केली आहे.

७. अर्जदाराचे पुढे कथन असे की, गैरअर्जदार यांचेकडे २५ एकर बागायती शेती आहे. गैरअर्जदार यांचा दुधाचा व्यवसाय आहे व गैरअर्जदार क्र. १ हा थेरीपिस्ट डॉक्टर आहे. त्यांचे वर्षाकाठी २५ लाख रुपये उत्पन्न आहे व शेतीचे ३० ते ३५ लाख रुपये उत्पन्न आहे. गैरअर्जदार क्र. २ हा कॉलेजचा प्रिन्सीपल आहे व त्याला दीड लाख रुपये पगार आहे. करिता, अर्जदाराने प्रस्तुत अर्ज गैरअर्जदाराकडुन रुपये २०,०००/– प्रति महिना मॉनेटरी रिलीफ व घरभाडे रु. ५,०००/– दरमहा व मेडीकल दवाखाना खर्च रु. ५,०००/– दरमहा असे दरमहा रु.१०,०००/– अंतरीम पोटगीची मागणीसाठी दाखल केला आहे.

८. गैरअर्जदार क्र.१ ते ५ यांनी प्रकरणात हजर होवुन, त्यांचे लेखी म्हणणे वर दाखल केले आहे आणि अर्जदाराने केलेल्या सर्व तक्रारी त्यांनी स्पष्टपणे नाकारलेल्या आहेत. गैरअर्जदारांनी त्यांच्या लेखी म्हणण्यात अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ यांचे लग्न झाल्याचे मान्य केलेले आहे, उर्वरीत सर्व कथने अमान्य केलेली आहेत. गैरअर्जदारांनी त्यांचे लेखी म्हणण्यात कथन केले आहे की, लग्नातील खर्च अर्जदार व गैरअर्जदारांनी ज्याचा–त्याचा केलेला आहे. लग्नात देणे–घेणे झालेले नाही. लग्नात दिलेली सर्व दागिने अर्जदाराच्या ताब्यात आहेत. लग्नानंतर अर्जदार गैरअर्जदाराच्या घरी नांदण्यास आल्यानंतर गैरअर्जदाराला समजले की, गैरअर्जदार क्र.१ याच्यासोबत अर्जदाराचा विवाह होण्यापुर्वी दुसऱ्या मुलासोबत साखरपुडा झालेला होता. अर्जदार सुरुवातीपासुनच आनंदाने राहत नव्हती. अर्जदार जास्त वेळ मोबाईल वापरत असे. घरातील कामे करत नसे. सतत वेगवेगळी कारणे काढुन रुममध्ये येऊन झोपत असे व मोबाईल इंस्टाग्राम वर व्यस्त असे. अर्जदार ही एका नातेवाईकाच्या लग्नानिमित्त गैरअर्जदार क्र.१ ची कपाटात ठेवलेली रक्कम रुपये ५५ हजार, किमती साड्या व सर्व दागदागिने घेऊन माहेरी गेली व त्यानंतर पुन्हा

नांदण्यास आली नाही. गैरअर्जदार क्र.१ ने विचारपुस करण्यासाठी अर्जदाराला फोन केला असता, अर्जदार व तिच्या आई–वडीलांनी गैरअर्जदारांविरुध्द खोट्या केसेस करण्याची धमकी दिली. त्यामुळे गैरअर्जदार क्र.१ यांनी अर्जदाराविरुध्द मा. पोलिस अधिक्षक साहेब, अहमदनगर यांच्या कार्यालयामध्ये दि. ३०.०५.२०२४ रोजी तक्रार दाखल केलेली आहे. अर्जदार ही दि. ०१.०५.२०२४ पासुन अर्जदार ही स्वतःहुन माहेरी राहत असल्याने व गैरअर्जदारास संसार सुखापासुन वंचित ठेवल्याने मुस्लीम धर्मशास्त्रातील तरतुदीप्रमाणे अर्जदारास तलाकुल एहसान या पध्दतीने तलाक दिला आहे.

९. गैरअर्जदारांचे पुढे कथन केले आहे की, गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदारापेक्षा कमी शिकलेला असुन गैरअर्जदार क्र.१ यांचे स्वतःचे स्वतंत्र उत्पन्न नाही. गैरअर्जदार यांची वडीलोपार्जित जिरायती ७ एकर शेत मिळकत आहे. त्या शेतीतुन येणाऱ्या पिकावर, तसेच छोट्या दुधाच्या धंद्यातुन गैरअर्जदार क्र.१ यास घर चालवणे इतपत दहा–बारा हजार रुपये दरमहा उत्पन्न मिळते. त्यावर गैरअर्जदार क्र.१, त्याची आई व बहीण हे अवलंबुन आहेत. गैरअर्जदार क्र.२ हे श्रीगोंदा तालुक्यात शिक्षक म्हणुन नोकरीस आहेत व त्यांचा दुसरा विवाह झालेला असुन ते त्यांची पत्नी व दोन मुलांसह राहतात. गैरअर्जदार क्र. २ व ३ हे वृध्द असल्याने त्यांचे औषधोपचाराचा खर्च गैरअर्जदार क्र.१ यालाच करावा लागतो. त्यामुळे गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदारास स्वतंत्र पोटगी देऊ शकत नाही. उलटपक्षी, अर्जदार ही १२ वी सायन्स शिक्षीत असुन पुढे डिग्रीचे उच्च शिक्षण घेत आहे व तिच्या वडीलांचे नामांकित कंपनीचे रंगाचे दुकान आहेत व अर्जदार त्या दुकानात कॉलेज संपल्यानंतर अकाउंट सांभाळण्याचे काम करते व त्यामुळे तिच्या वडीलांचे दरमहा रु. १५,०००/– रुपये बचत होतात. अर्जदाराची माहेरची परिस्थीती सधन व चांगली आहे. अर्जदार तिचा उदरनिर्वाह चालवण्यास समर्थ आहे. करिता, गैरअर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज फेटाळण्याची विनंती केली.

१०.  प्रस्तुतचा अर्ज विचारात घेतांना अर्जदार हिने गैरअर्जदार यांनी तिच्यावर वेळोवेळी कौटुंबिक हिंचासार केला, ही बाब तिने प्रथमदर्शनी सिध्द करणे आवश्यक आहे. गैरअर्जदाराने अर्जदारासोबत पती–पत्नी नाते असल्याचे मान्य केलेले आहे.

११.  सदरची स्टेज प्राथमिक असल्यामुळे अंतरिम पोटगी मिळणेसाठी अर्जदार यांनी प्रथम दर्शनी तिच्यावर गैरअर्जदार यांचेकडुन कौटुंबिक हिंसाचार झाला हे सिध्द करणे आवश्यक आहे. सदरील बाब सिध्द करणेसाठी अर्जदार यांनी तिच्या मुळ अर्जात व अंतरिम पोटगी मिळणेसाठीच्या अर्जात गैरअर्जदार यांचेविरुध्द कौटुंबिक हिंसाचाराचे आरोप प्रतिज्ञापत्रावर केलेले आहेत. सदरील कथने अर्जदार यांचेवर कौटुंबिक हिंसाचार सिध्द करणेसाठी प्रथमदर्शनी पुरेसे आहेत. त्यामुळे अर्जदार यांनी अर्जात केलेल्या कथनानुसार व अभिलेखावर दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन अर्जदारावर कौटुंबिक हिंसाचार झाला ही बाब प्रथमदर्शनी सिध्द होत आहे. गैरअर्जदार यांनी त्यांचे कथनापृष्ठ्यर्थ कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर सादर केलेला नाही.

१२.  अर्जदार यांनी तिच्यावर कौटुंबिक हिंसाचार होत असल्याचे प्रथमदर्शनी दाखवल्यामुळे ती कौटुंबिक हिंसाचार कायद्यांतर्गत विविध फायदे (Reliefs) मिळण्यास पात्र ठरते. सदरील अंतरिम अर्जाद्वारे अर्जदार हिने गैरअर्जदार यांचेकडुन दरमहा १०,०००/– रुपयांची अंतरिम पोटगी मागीतलेली आहे.

१३.  अंतरिम पोटगी मंजुर करतेवेळी अर्जदार व गैरअर्जदार यांची आर्थीक परिस्थिती ही भुमिका पार पाडत असते. अर्जदार हीने अर्जात नमुद केले आहे की, ती पुर्णपणे गैरअर्जदारावर अवलंबुन आहे. ती तीच्या आई–वडीलांकडे राहते. तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. तसेच अर्जदाराने तिचे मालमत्ता व दायित्त्व प्रमाणपत्रामध्ये नमुद केले आहे की, गैरअर्जदार क्र. १ हा थेरीपिस्ट आहे व त्यापासुन त्याला वर्षाकाठी २५ लाख रुपये उत्पन्न आहे. तसेच त्यांच्याकडे २५ एकर बागायती

शेती व दुधाचा व्यवसाय देखील आहे, त्यापासुन त्यांना वर्षाकाठी ३० ते ३५ लाख रुपये उत्पन्न आहे अशी कथने अर्जदाराने केलेली आहेत; परंतु गैरअर्जदार क्र. १ याच्या उत्पन्नाबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही.

**१४.** तसेच गैरअर्जदार याने त्याच्या मालमत्ता व दायित्व प्रतिज्ञापत्रामध्ये तो शेती व दुधव्यवसाय करत असुन त्यास दरमहा पंधरा हजार रुपये इतके उत्पन्न मिळते असे कथन केले आहे. त्यामुळे गैरअर्जदार क्र. १ यास शेती व दुध व्यवसायातुन उत्पन्न मिळते व त्यास उत्पन्नाचे साधन आहे, ही बाब स्पष्ट होते. तसेच गैरअर्जदार क्र. २ हे शिक्षक असुन त्यांचा खर्च हा त्यांच्या नोकरीतुन मिळणाऱ्या उत्पन्नातुन भागविला जातो असे गैरअर्जदार यांचेच कथन आहे. त्यामुळे गैरअर्जदार क्र. २ हे गैरअर्जदार क्र. १ वर अवलंबुन असल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदार यांना अंतरिम पोटगी देण्यासाठी सक्षम असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. याउलट अर्जदाराकडे स्वतःचे उत्पन्नाचे साधन नाही. मुळ अर्जाचा निकाल लागण्यासाठी बराचसा कालावधी जाणार आहे. अर्जदार हिस वेळोवेळी प्रकरणाच्या चौकशीसाठी न्यायालयात हजर रहावे लागणार आहे. तिला वकील फी व जाणे–येण्याचा खर्च सोसावा लागेल, तसेच दरम्यानच्या काळात तिला तिच्या आई–वडीलांच्या आश्रयाने जीवन व्यतीत करावे लागणार आहे. त्यामुळे अर्जदार ही गैरअर्जदार यांचेकडुन अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे. त्यामुळे वरील विवेचनाचा विचार करता गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदारास प्रति महिना ५,०००/– रु. (रुपये पाच हजार मात्र) अंतरिम पोटगी देणे न्यायसंगत होईल. करीता मी मुद्दा क्र.१ व २ यांचे उत्तर होकारार्थी नोंदवित आहेत.

**<u>मुद्दा क्र.३ करीताः</u>**

**१५.** मुद्दा क्र.१ व २ च्या उत्तरादखल अर्जदार ही गैरअर्जदारकडून अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र ठरलेली आहे. अर्जदार यांनी अंतरिम संरक्षण मिळण्याची दाद मागीतली आहे. परंतु त्यासंदर्भात कोणताही पुरावा अभिलेखावर सादर केला नाही.

त्यामुळे सदरची दाद मंजुर करता येण्याजोगी नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज अंशतः मंजुर करणे न्यायोचित होईल. सबब, मी मुद्दा क्र.३ चे उत्तरादाखल पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) प्रस्तुतचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२) गैरअर्जदारा क्र.१ यांनी मुळ अर्ज दाखल केल्याच्या तारखेपासून अर्जदारास प्रति महिना रु. ५,०००/- (रुपये पाच हजार मात्र) अंतरिम पोटगी द्यावी.

३) गैरअर्जदारा क्र.१ ने प्रतीमहा रु. ५,०००/- (रुपये पाच हजार मात्र) रक्कम अर्जदारास हमदस्त द्यावी किंवा न्यायालयात जमा करावी.

४) या आदेशाची प्रमाणीत प्रत उभय पक्षकारांना मोफत देण्यात यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by KALE NILESH SUDAM
Date: 2025.12.16 17:10:36 +0530

**दिनांकः** १६.१२.२०२५. ( एन.एस. काळे )
**वैजापूर.** **प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, वैजापूर.**